मा.सर्वोच्च न्यायालयातील स्पेशल लिव्ह पिटीशन ३४७०३/२०१० चे रुपांतर झालेल्या सिव्हील अपील क्रमांक ३४४५/२०११ प्रकरणी द्विसदस्यीय क्लेम्स् समिती नेमण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक : ससाका-२०१८/प्र.क्र.६३/३-स,
मंत्रालय, सहावा मजला, विस्तार इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १९ मार्च, २०१८.

वाचा: १) क्रमांक: ससाका-२०१८/प्र.क्र. ६३/३-स, दि. ०५.०३.२०१८ चे पत्र.

प्रस्तावना:-

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई या बँकेने सहकार, पणन व वस्त्रोद्योग या विभागाने वेळोवेळी दिलेल्या हमीपोटी मुद्दल व व्याजासह रक्कम देण्याबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्याबाबतीत मा.उच्च न्यायालयात झालेल्या निर्णयास राज्य सहकारी बँकेने मा.सर्वोच्च न्यायालयात एस.एल.पी. क्र.३४७०३/२०१० दाखल केलेली होती. सदर एस.एल.पी.चे रुपांतर सिव्हील अपील क्रमांक ३४४५/२०१ मध्ये झालेले आहे. या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक १५.०२.२०१७ रोजीच्या अंतरीम आदेशानुसार बँकेकडील कागदपत्रांच्या आधारे शासनाने दिलेल्या हमीपोटी किती रक्कम देय होईल त्याची परिगणना करुन सादर करण्याचे आदेश दिले आहेत. यानुषंगाने विभागाची क्षेत्रीय कार्यालये तसेच शासन स्तरावर उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे वेळोवेळी झालेल्या बैठकीत जी रक्कम देय असल्याचे सकृतदर्शनी दिसून आले आहे. त्याबाबत शासन व बँकेमध्ये सहमती होवू शकली नाही. या पार्श्वभूमीवर तसेच बँक व शासनाच्या हितास बाधा पोहोचू नये या दृष्टीने सर्व संबंधीत शासन आदेश व हमीचे दस्तऐवजांचा सखोल व कायदेशीर अभ्यास निष्पक्ष पद्धतीने करुन मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या पालनार्थ अंतिम निर्णय घेणे आवश्यक आहे. याबाबत वित्तीय व कायदे विषयक तज्ञ सदस्य असलेल्या क्लेम्स् समितीस ही जबाबदारी सोपविण्यात यावी व समितीच्या शिफारसी विचारात घेवून योग्य तो निर्णय घेण्यात यावा असे शासन व राज्य सहकारी बँकेमध्ये दिनांक १४.०२.२०१८ रोजी मा.मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सर्वानुमते ठरले आहे.त्यानुषंगाने सदरबाबतचा सविस्तर अभ्यास करुन अहवाल सादर करण्यासाठी वित्तीय व कायदेविषयक अनुभव असलेल्या तज्ञ सदस्यांची द्विसदस्यीय क्लेम्स् समिती नेमण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक १५.०२.२०१७ रोजीच्या अंतरीम आदेशाच्या पालनार्थ या प्रकरणी सर्व संबंधित अभिलेखे व कागदपत्रांचा सविस्तर अभ्यास करुन अहवाल सादर करण्यासाठी वित्तीय व कायदेविषयक अनुभव असलेल्या तज्ञ सदस्यांची द्विसदस्यीय क्लेम्स समिती खालीलप्रमाणे नियुक्त करण्यात येत आहे:-

१) श्री.बी. सी. खटुआ, सेवानिवृत्त, भा.प्र.से. अधिकारी.
२) श्री.सुनिल मोने, चार्टर्ड अकौंटंट, मुंबई.

०२. सदर समितीस मदतनीस म्हणून साखर आयुक्त, संचालक वस्त्रोद्योग व संचालक, पणन यांच्या कार्यालयातील खालील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत आहे. संबंधितांनी समितीस त्यांच्या विभागातील कामकाजाबाबत समन्वयन करावे:-

१) श्री.राजेश कुलकर्णी, संचालक(साखर), साखर आयुक्तालय, पुणे.
२) श्री.केशव तेलंग, सहनिबंधक(लेखापरीक्षण) साखर आयुक्तालय, पुणे.
३) श्री.मंगेश तिटकारे, सहसंचालक (अर्थ), साखर आयुक्तालय, पुणे.
४) श्री.आप्पाराव लिंबाजी घोलकर, सह संचालक(पणन), पणन संचालनालय, पुणे.
५) श्री.सुरेंद्र मधूकर तांबे, प्रादेशिक उपसंचालक(वस्त्रोद्योग), मुंबई विभाग.

०३. सदर मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

१) सदर समितीने शासनाने या प्रकरणी दिलेल्या हमी संबंधी बँक व शासनाकडील सर्व आदेश, बँक, शासन कर्ज दिलेल्या सहकारी संस्थांकडचे झालेल्या व्यवहारासंबंधी अभिलेख इत्यादींची सर्व बाबींची सखोल तपासणी, शहानिशा व अभ्यास करून राज्य सहकारी बँकेस थकहमीपोटी किती रक्कम देय राहील हे निश्चित करुन त्याबाबतच्या शिफारशी एका महिन्यात शासनास सादर कराव्यात.

२) सदर प्रकरणी पुढील कार्यवाहीस्तव निर्णय घेण्यासाठी समितीच्या शिफारसींचा योग्य तो विचार करण्यात येईल.

३) शासनास आवश्यकतेप्रमाणे या समितीत अन्य तज्ञ सदस्यांचा समावेश करता येईल.

४) या समितीच्या सदस्यांचे मानधन व इतर सोई सुविधा याबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.

०४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १६६(अ)/१८/व्यय-२, दिनांक १६.०३.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०३१९१६२६०९३००२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Deepak S Desai

Digitally signed by Deepak S Desai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=CMT Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4d11b2ee4dfa01facc6e58028a3bde93d4ac81d87ed6247ca0fb3a827602426f, cn=Deepak S Desai
Date: 2018.04.04 12:14:13 +05'30'

(दिपक शि. देसाई)
उप सचिव, सहकार (साखर), महाराष्ट्र शासन.

प्रत:-

१. मा. राज्यपाल महोदय यांचे खाजगी सचिव.
२. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
६. सर्व विधान सभा सदस्य, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव (सहकार) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभास, मंत्रालय, मुंबई.
९. श्री. बी. सी. खटुआ, सेवानिवृत्त भा.प्र.से. अधिकारी.
१०. श्री.सुनिल मोने, चार्टर्ड अकौंटंट, मुंबई.

११. साखर आयुक्त पुणे, महाराष्ट्र राज्य, (मुळ स्वाक्षरीच्या १० प्रतींसह)
१२. अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई.
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर/मुंबई.
१४. महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य, नागपूर/मुंबई.
१५. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
१६. उपसचिव, वित्त विभाग(व्यय-२, अर्थसंकल्प, अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.
१७. सह/उप/अवर सचिव/कक्ष अधिकारी (२२-स, २५-स, १७-स, १६-स, टेक्स-१ अ, ९-स) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. निवडनस्ती ३स.